नि.दि.दा.क्र. ३६/२०१२

नि. १७७ व ३०१ लगत

**<u>उर्वरीत उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ५ तर्फे ॲड टी.आर.पवार यांच्यातर्फे शपथेवर सुरु–</u>**

हे म्हणणे खरे आहे की रे.दि.मु.नं.११२/१९८० हा दावा वाटपाचा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की त्या दाव्यामध्ये खंडू व विठ्ठल यांची कौटुंबीक व्यवस्था झाली आहे असे म्हटलेले नव्हते. त्यांच्यात कौटुंबीक व्यवस्था सन १९३० मध्ये झाली होती. हे मला सांगता येणार नाही की ती कोणत्या महिन्यात झाली होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या दाव्यात व सरतपासामध्ये कौटुंबीक व्यवस्थेबद्दल सविस्तर कथन केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की दाव्यामध्ये कौटुंबीक व्यवस्था कोणत्या साली झाली याबाबत उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की कौटुंबीक व्यवस्था झाली हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की कौटुंबीक व्यवस्था झाल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की खंडु तुकाराम यांची एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणून कधीही नोंद नव्हती. खंडु तुकाराम यांची ए.कु.मॅ. म्हणून नोंद कोणत्या फेरफारने होती व त्याचा फेरफार नंबर काय होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यांची ए.कु.मॅ. म्हणून नोंद असल्याचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की ए.कु.मॅ. म्हणून नोंद असल्याचा कागदोपत्री पुरावा नसल्याने तसा दाव्यामध्ये व सरतपासामध्ये उल्लेख केलेला नाही. तुकाराम हे सन १९०६ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की सन १९३० मध्ये खंडू व विठ्ठल यांच्या नावाची नोंद झाली. मिळकती या केवळ खंडू यांच्या नावाने होत्या. हे म्हणणे खरे आहे की विठ्ठलच्या नावाने नोंदी नव्हत्या असे माझे म्हणणे आहे. माझ्या जादा सरतपासातील परिच्छेद क्र.३ मध्ये सन १९३० चे पूर्वी नंतर व त्यादरम्यान फार कमी मिळकतीच्या रेकॉर्डला विठ्ठल याचे नाव लागले असा मजकूर नमुद आहे.

प्रश्न – तुमच्या सरतपासातील कथनाप्रमाणे विठ्ठल याचे नाव फार कमी मिळकतीच्या रेकॉर्डला लागले म्हणजे त्या मिळकती कोणत्या.

उत्तर – नावच लागले नव्हते. (साक्षीदार हा प्रश्नाचे योग्य उत्तर देत नसल्याने त्याच्या वर्तणूकीची नोंद या ठिकाणी घेण्यात येते.)

हे म्हणणे खरे आहे की विठ्ठल व खंडू हे पूर्वी वेगवेगळे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की खंडेराव हे दिनांक १४/०८/१९५७ ला मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की ते

मयत झाल्यानंतर त्यांच्या नावे असलेल्या मिळकतीला त्यांच्या तीन मुलांच्या नावाची नोंद फेरफार क्र.१११०२ ने झाली. हे म्हणणे खरे आहे की सदर नोंद दिनांक २७/०२/१९५८ रोजी झाली. हे म्हणणे खरे आहे की सदर नोंद ही वारस नोंद आहे. विठ्ठल हे सन १९९३ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की विठ्ठल याने सदर नोंद सन १९५८ पासून सन १९९३ पर्यंत आव्हानीत केली नव्हती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की त्याबाबत दावे चालू होते. आम्ही दाखल केलेला दावा नोंद रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला नव्हता. त्याबाबत रे.दि.मु.नं.११२/१९८० मध्ये कथन केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की विठ्ठल यांच्या नावे असलेल्या जमीनींना गौतम विठ्ठल यांचे नाव लागले. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की त्या मिळकती आम्ही खरेदी केल्या होत्या. गट नं.९७०, १११०, १८५३ इ. मिळकती आम्ही खरेदी केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की ज्या मिळकती आम्ही खरेदी केल्या होत्या त्या या दाव्यात सामील केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही ज्या मिळकती खरेदी केल्या त्याची खरेदी पत्रे आम्ही या दाव्यात दाखल केलेली नाहीत. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की काही खरेदीपत्रे दाखल केली आहेत. साक्षीदार दाव्याचे अवलोकन केल्यानंतर असे कथन करतो की, कोणतेही खरेदी पत्र दाव्यात दाखल केलेले नाही. ती खरेदीपत्रे दाखल करण्यास मी तयार आहे.

प्रश्न – विठ्ठल याच्या पश्च्यात दशरथ व गौतम यांची प्रत्येकी ४ आणे हिस्स्याने नोंद झाली.

उत्तर – ती मिळकत पुतणे वारसाने आलेली जमीन आहे व दाव्यातील जमीन नाही.

सदर मिळकतीचा गट नं.१०८८/१ब आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील मयत झाल्यानंतर माझी व इतर वारसांची नोंद फेरफार क्र.२११९७ ने झाली. हे म्हणणे खरे आहे की फेरफार नं.२११९७ मध्ये दशरथ याच्या नावाची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर फेरफार नुसार नमुद मिळकतींना आम्हा वारसांची नावे लागली. हे म्हणणे खरे आहे की सदर फेरफारने वडीलार्जित जमीनींना आमची नावे लागली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की सन १९८१ साली मुळ प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्यामध्ये वाटप झाले. हे म्हणणे खरे आहे की सदर वाटपानुसार फेरफार नं.१५९३४ नुसार मुळ प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावाची नोंद झाली **(सदरचा फेरफार वादीनेच दाखल केलेला असून त्यातील मजकूर वादीस मान्य नाही असे त्याचे कथन आहे. सदर साक्षीदार असे कथन करतो की, सदर फेरफार मधील नोंद ही वारसानुसार झाली. परंतु, सदर फेरफारमध्ये वारस नोंदीचा कुठेही उल्लेख**

**नाही याची या ठिकाणी नोंद घेण्यात येते.)** हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या सन १९८१ मध्ये झालेल्या नोंदीनुसार त्यांच्या वारसांच्या पुढे नोंदी झाल्या. हे म्हणणे खरे नाही की फेरफार नं.१५९३४ वर मी अपील केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादींनी त्यांच्या नावे असलेल्या मिळकतीचा हस्तांतरणाचा कागद मला, माझ्या वडीलांना अथवा चुलते दशरथ यांना करुन दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की सेवानिवृत्त तहसिलदार वाघ हे आमचे नातेवाईक होते. हे म्हणणे खरे आहे की नोंद रद्द करायचे अधिकार प्रांत यांना असतात. हे म्हणणे खरे आहे की तहसिलदार यांना आम्ही सन २००४ मध्ये अर्ज दिला होता. सदरचा अर्ज आम्ही फेरफार क्र.११९०२ व १५९३४ याबाबत दिला होता. हे म्हणणे खरे आहे की सदरचा अर्ज सन २००४ मध्ये दाखल करण्यापूर्वी प्रतिवादी, त्यांचे वडील अथवा चुलत्यांनी आम्हाला हस्तांतरणाचा दस्त करुन दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की तहसिलदार वाघ यांच्या मदतीने आम्ही तो फेरफार रद्द करण्याचा आदेश मिळवला. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींना तहसिलदार यांनी नोटीस काढली नव्हती व त्यांचे जाबजबाब देखील नोंदवले नव्हते. त्या कामात जाबजबाब घेतले होते. ते जाबजबाब दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर आदेशाविरुद्ध प्रतिवादींनी प्रांत अधिकारी यांच्याकडे अपील केले. त्याचा निकाल आमच्या सारखा झाला. हे म्हणणे खरे आहे की त्या निकालाविरुद्ध प्रतिवादींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दुसरे अपील क्र.१९२/२००३ दाखल केले होते. त्याचा निकाल देखील आमच्या सारखाच झाला. हे म्हणणे खरे आहे की त्या निकालाविरुद्ध प्रतिवादींनी अप्पर आयुक्त पुणे यांच्याकडे रिव्हीजन दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की सदर रिव्हीजनमध्ये आमच्या विरुद्ध निकाल झाला व प्रतिवादींच्या सारखा निकाल झाला. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदर निर्णया विरुद्ध आम्ही वरच्या कोर्टात अपील केले आहे. हे म्हणणे खरे नाही की अप्पर आयुक्त यांच्या निकालाला स्थगिती दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की वरच्या कोर्टात अपील केले व सदर निकालाला स्थगिती दिली आहे याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की खंडेराव याच्या नावे असलेल्या काही मिळकती त्याने गहाण दिल्या व काही मिळकती खरेदी दिल्या. हे म्हणणे खरे नाही की खंडेराव याने खरेदी दिलेल्या मिळकतीबाबत दशरथ अथवा गौतम यांनी कधीही वाद उपस्थित केला नव्हता. खंडेराव यांनी विकलेल्या मिळकतीबाबत दशरथ व गौतम यांनी कधीही वाद उपस्थित केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की विठ्ठल मयत झाल्यानंतर

दशरथ व गौतम यांची वारस म्हणून फेरफार नं.२११९७ ने नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे नं.८४०/४ ला दशरथ विठ्ठल ४ आणे व आमचे ४ आणे अशा नोंदी झाल्या. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे नं.१०८८/२अ/३ ला दशरथ विठ्ठल ४ आणे अशी नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की दशरथ याची सर्व्हे नं.१०८८/२अ/२ ला ४ आणे अशी नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे नं.१०८८/२अ/१, १०८६/५, १०८८/२क, ९००/७ब, ९००/२ब, १०७४, ११५३/७ब, ११५३/५क, ११५३/५ड या मिळकतीस दशरथ यांची ४ आणे हिस्स्याला नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे नं.१०७९/१ व ९४१/९ ला दशरथ विठ्ठल याची २ आणे हिस्स्याला नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की जेवढया हिस्स्याला दशरथची नोंद होती तेवढयाच हिस्स्याला गौतमची नोंद होती. हे म्हणणे खरे नाही की धोम धरणाच्या वेळी जमीन अधिग्रहण केली त्यावेळी माझे वडील, चुलते व मयत प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावाची नोंद होती.

**प्रतिवादी वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

कोरेगाव
दि. २१/१०/२०२४

**(ए. ए. पाचरणे)**
सह दिवाणी न्यायाधीश कोरेगाव.